# 'देवचंद'ला क्रिएटिव्ह परफॉर्मन्स पुरस्कार

## सायबर जागृतीची दखल : पुण्यातील समारंभात वितरण

**■ सकाळ वृत्तसेवा**

निपाणी, ता. १२ : अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद महाविद्यालयाला पुणे येथील क्विक हिल फाउंडेशनकडून सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा २०२४ अंतर्गत क्रिएटिव्ह परफॉर्मन्स पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सायबर जागृतीच्या व्यापक कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार दिला असल्याचे संयोजकांनी सांगितले. पुणे येथे झालेल्या समारंभात मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण झाले.

देवचंद महाविद्यालयात संगणकशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी क्विक हिल फाउंडेशनच्यावतीने सायबर सुरक्षा जागरूकता मासानिमित्त 'सायबर सुरक्षा व जागरूकता' या विषयावर 'कमवा आणि शिका' योजनेंतर्गत प्रशिक्षण शिबीर घेतले होते. त्यात ५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. जवळपास दहा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या सायबर वॉरियरकडून सायबर जागरूकतेचे धडे घेतले.




पुणे : येथे अनुपमा काटकर व मान्यवरांकडून पुरस्कार स्वीकारताना प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे, प्रा. प्रशांत कुंभार व विद्यार्थी.

या उल्लेखनीय कार्यासाठी क्विक हिल फाउंडेशनने महाविद्यालयातील १० विद्यार्थी, १ शिक्षक आणि देवचंद महाविद्यालयाची निवड केली होती. त्यापैकी समृध्दी भराडे आणि शीतल शिरगावे या विद्यार्थिनींना बेस्ट प्रोसेस कंप्लायंस, प्रा. प्रशांत कुंभार यांना एक्स्ट्रा माईल रिकग्नेशन अॅवॉर्ड, तर महाविद्यालयाला क्रिएटिव्ह परफॉर्मन्स पुरस्कार लाभला. प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे, प्रा. प्रशांत कुंभार, क्विक हिलच्या सीओई अनुपमा काटकर यांच्यासह मान्यवर, पदाधिकारी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष आशिष शाह, उपाध्यक्षा डॉ. तृप्ती शाह यांनी महाविद्यालयातील घटकांचे अभिनंदन केले.